प्रसिद्धी विभाग

शैक्षणिक वर्ष २०१८ – १९

**साहेबरावजी बुट्टपाटील स्मृती व्याख्यानमाला**

# राष्ट्र हेच सावरकरांचे जीवनमूल्य : डॉ. शेवडे

लोकमत न्यूज नेटवर्क

**राजगुरुनगर :** तत्त्वज्ञ, इतिहासकार, कवी, क्रांतिकारक, देशभक्त, साहित्यिक, पत्रकार अशी एकाच मानवी शरीरात असलेली प्रतिभासंपन्न व्यक्तिमत्त्वाची विविध रूपे स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या रूपाने भारताच्याच नव्हे, तर जगाच्या इतिहासात सुवर्णाक्षराने कोरली गेली असून ते खऱ्या अर्थाने महाराष्ट्राचे ललामभूत व्यक्तिमत्त्व असल्याचे गौरवोद्गार डॉ. सच्चिदानंद शेवडे यांनी काढले.

हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात आयोजित साहेबरावजी बुट्टे-पाटील स्मृती व्याख्यानमालेत 'सावरकर एक झंझावात' या विषयावर डॉ. शेवडे बोलत होते. डॉ. सच्चिदानंद शेवडे यांनी सांगितले, की राष्ट्र हेच सावरकरांचे जीवनमूल्य होते. त्यामुळे त्यांचे साहित्य हे राष्ट्रहिताच्या अनुषंगानेच निर्माण झाले आहे. यावेळी त्यांनी सावरकरांच्या जीवनातील निवडक प्रेरणादायी प्रसंग सांगून विद्यार्थ्यांना सावरकरांच्या स्वातंत्र्य चळवळीतील योगदानाची माहिती दिली. सावरकरांच्या भाषाशुद्धीच्या चळवळीबद्दल बोलताना त्यांनी मराठी भाषेला सावरकरांनी नव्या शब्दांची देणगी दिली असून रत्नागिरीच्या स्थानबद्धतेच्या काळात अस्पृश्योद्धाराच्या कार्यासोबतच सावरकरांनी भाषाशुद्धीची चळवळ जोमाने चालवली. त्यांच्यामुळेच महापौर, प्रशाला, प्राचार्य, दिग्दर्शन, संकलन, निर्माता असे अनेक शब्द मराठीत रूढ झाल्याचे ते म्हणाले. गांधींच्या हत्येत सावरकरांना जाणीवपूर्वक गुंतवण्यात आल्याचे ते म्हणाले. तारुण्य हे वयावर किंवा केसाच्या रंगावर न ठरता ते त्या त्या व्यक्तीच्या ऊर्जेवर ठरायला हवे, असे सांगून आपण मुलांना पराक्रमाचा इतिहास शिकवत नसल्याने मुलांमध्ये राष्ट्राबद्दलची ऊर्मी कमी झाली आहे. त्यामुळेच लष्करात अधिकाऱ्यांच्या हजारो जागा रिक्त असल्याचे ते म्हणाले. महाराष्ट्र सरकारकडे सावरकरांचे इंग्लंडमधील निवासस्थान असलेले इंडिया हाऊस ताब्यात घेऊन तेथे त्यांचे यथोचित स्मारक उभारण्याची मागणी केली.

# स्वातंत्र्यवीर सावरकर महाराष्ट्राचे ललामभूत व्यक्तिमत्त्व

## डॉ. शेवडे : राजगुरूनगरात 'सावरकर एक झंझावात'वर मार्गदर्शन

**राजगुरूनगर, दि. ३० (प्रतिनिधी)** - तत्त्वज्ञ, इतिहासकार, कवी, क्रांतिकारक, देशभक्त, साहित्यिक, पत्रकार अशी एकाच मानवी शरीरात असलेली प्रतिभासंपन्न व्यक्तीमत्त्वाची विविध रूपे स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या रूपाने भारताच्याच नव्हे, तर जगाच्या इतिहासात सुवर्णाक्षराने कोरली गेली आहेत. ते खऱ्या अर्थाने महाराष्ट्राचे ललामभूत व्यक्तिमत्त्व असल्याचे गौरवोद्गार डॉ. सच्चिदानंद शेवडे यांनी काढले.

राजगुरूनगर येथील हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात आयोजित साहेबरावजी बुट्टेपाटील स्मृती व्याख्यानमालेत 'सावरकर एक झंझावात' या विषयावर डॉ. शेवडे बोलत होते. या प्रसंगी संस्थेचे संचालक शांताराम घुमटकर, ॲड. मुकुंदराव आवटे, बाळासाहेब सांडभोर, उमेश आगरकर, प्राचार्य डॉ. एस.बी. पाटील, व्याख्यानमाला समितीच्या अध्यक्षा ॲड. राजमाला बुट्टेपाटील, उपप्राचार्य .प्रा.जी.जी. गायकवाड, प्रबंधक कैलास पाचारणे व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.



**राजगुरुनगर : साहेबरावजी बुट्टेपाटील स्मृती व्याख्यानमालेत उपस्थित विद्यार्थी व मान्यवर. इन्स्टेमध्ये मार्गदर्शन करताना डॉ. सच्चिदानंद शेवडे.**

डॉ. सच्चिदानंद शेवडे म्हणाले की, राष्ट्र हेच सावरकरांचे जीवनमूल्य होते. त्यामुळे त्यांचे साहित्य हे राष्ट्रहिताच्या अनुषंगानेच निर्माण झाले आहे. यावेळी त्यांनी सावरकरांच्या जीवनातील निवडक प्रेरणादायी प्रसंग सांगून विद्यार्थ्यांना सावरकरांच्या स्वातंत्र्य चळवळीतील योगदानाची माहिती दिली. सावरकरांच्या भाषा शुद्धीच्या चळवळीबद्दल बोलताना त्यांनी मराठी भाषेला सावरकरांनी नव्या शब्दांची देणगी दिली असून रत्नागिरीच्या स्थानबद्धतेच्या काळात अस्पृश्योद्धाराच्या कार्यासोबतच सावरकरांनी भाषाशुद्धीची चळवळ जोमाने चालवली. त्यांच्यामुळेच महापौर, प्रशाला, प्राचार्य, दिग्दर्शन, संकलन, निर्माता असे अनेक शब्द मराठीत रूढ झाल्याचे ते म्हणाले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. धनंजय बोऱ्हाडे यांनी, वक्त्यांचा परिचय डॉ. कैलास सोनवणे यांनी तर अक्षय कोळेकर याने आभार मानले.

### मुलांमध्ये राष्ट्राबद्दलची उर्मी कमी

स्वतंत्र भारतात आपण क्रांतिकारकांची उपेक्षा केल्याचे सांगून महात्मा गांधींच्या हत्येत सावरकरांना जाणीवपूर्वक गुंतवण्यात आले. तारूण्य हे वयावर किंवा केसाच्या रंगावर न ठरता ते त्या त्या व्यक्तीच्या उर्जे वर ठरायला हवे. आपण मुलांना पराक्रमाचा इतिहास शिकवत नसल्याने मुलांमध्ये राष्ट्राबद्दलची उर्मी कमी झाली आहे. त्यामुळेच लष्करात अधिकाऱ्यांच्या हजारो जागा रिक्त आहेत. आपण जातीपातीच्या पलिकडे जाऊन मी भारतीय आहे अशी आपली पहिली ओळख निर्माण करायला हवी, असे डॉ. सच्चिदानंद शेवडे यांनी नमूद केले.

# सावरकर हे महाराष्ट्राचे भूषण

## डॉ. शेवडे यांचे प्रतिपादन; राजगुरुनगरला बुट्टेपाटील व्याख्यानमाला

**राजगुरुनगर, ता. ३१ : ''शिक्षेतून सवलत मिळण्यासाठी स्वातंत्र्यवीर सावरकरांनी इंग्रजांना दिलेले कथित माफीपत्र हे तद्दन खोटे आहे. महाराष्ट्राचे भूषण असलेल्या या उत्तुंग व्यक्तिमत्त्वाला भारतरत्न देण्याऐवजी त्यांचे चारित्र्यहनन केले जाते.'' अशी खंत लेखक डॉ. सच्चिदानंद शेवडे यांनी येथे व्यक्त केली.**



**डॉ. शेवडे**

साहेबरावजी बुट्टेपाटील स्मृती व्याख्यानमालेत 'सावरकर-एक झंझावात' या विषयावर ते बोलत होते.

ते म्हणाले, ''आपल्या देशासाठी आयुष्यातील २७ वर्षे तुरुंगात घालविलेल्या नेल्सन मंडेलांना भारतरत्न दिला जातो, मात्र तेवढीच वर्षे भारतासाठी तुरुंगात घालविलेल्या सावरकरांच्या वाट्याला काय आले? जशी महात्मा गांधी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, नेताजी सुभाषचंद्र बोस यांची ब्रिटनमधील घरे शासनाने विकत घेतली, तसे सावरकरांचे वास्तव्य असलेले 'इंडिया हाउस'सुद्धा घ्यायला हवे होते.''

देशभक्त, क्रांतिकारक, साहित्यिक, कवी, इतिहासकार, पत्रकार अशा अनेक भूमिका प्रतिभासंपन्न स्वातंत्र्यवीर सावरकरांनी पार पाडल्या. त्यांना फ्रान्समध्ये अटक झाल्यावर फ्रान्स सरकारच्या विरोधात निदर्शने झाली आणि तत्कालीन फ्रेंच पंतप्रधानांना राजीनामा द्यावा लागला होता, असेही शेवडे म्हणाले.

राष्ट्र हेच सावरकरांचे जीवनमूल्य होते. त्यामुळे त्यांचे साहित्य हे राष्ट्रहिताच्या अनुषंगानेच निर्माण झाले आहे. रत्नागिरीच्या स्थानबद्धतेच्या काळात सावरकरांनी भाषाशुद्धीची चळवळ चालवली. परकीय शब्दांमुळे मातृभाषेतील त्या अर्थाचा मूळ शब्द मरतो, असे सावरकरांचे मत होते. त्यांनी मराठी भाषेला महापौर, प्रशाला, प्राचार्य, दिग्दर्शक, संकलक, निर्माता असे अनेक शब्द दिले, असेही शेवडे म्हणाले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. धनंजय बोऱ्हाडे यांनी केले. वक्त्यांचा परिचय डॉ. कैलास सोनावणे यांनी करून दिला. तर आभार अक्षय कोळेकर याने मानले.

## यशस्वी जीवनासाठी जगण्याचे मर्म समजले पाहिजे : कोष्टी



**अजितकुमार कोष्टी**

''जीवन सुंदर व यशस्वी होण्यासाठी जगण्याचे मर्म समजले पाहिजे, म्हणजे त्यातूनच जीवनाची लय सापडेल.'' असे मत हास्यकलाकार प्रा. अजितकुमार कोष्टी यांनी केले.

साहेबरावजी बुट्टेपाटील स्मृती व्याख्यानमालेच्या दुसऱ्या व्याख्यानात 'हसवणूक' या विषयावर बोलत होते. कोष्टी यांनी त्यांच्या नेहमीच्या शैलीत अनेक विनोदी किस्से सांगितले. ते म्हणाले, ''विनोदाला विषय नसतो तर प्रत्येक विषयात विनोद असतो. विनोद समजून घेण्यासाठी प्रत्येकात छोट मुलं दडलेलं असावं लागत. योग्यवेळी पुस्तकांचा सहवास लाभल्यामुळे माझी जडणघडण झाली. मुलांनी खूप वाचन करावे. मोबाईलपासून दूर राहा. स्वतःच्या क्षमता सिद्ध करा. आपण कोणत्या क्षेत्रासाठी योग्य आहोत ते शोधा. स्वतःसाठी वेळ द्या. योगाभ्यास करा. जगण्यावर प्रेम करा.'' जीवनातील बारकावे समजून घेऊन हसतखेळत जगा आणि जीवनास समर्थपणे सामोरे जा, असा सल्ला त्यांनी विद्यार्थ्यांना दिला.

... आयोजन केले होते.



**हुतात्मा राजगुरू महाविद्यालयातील व्याख्यानमालेस उपस्थित विद्यार्थी आणि बोलताना डॉ. सच्चिदानंद शेवडे.**

# 'स्वा. सावरकर ललामभूत व्यक्तिमत्त्व'

**राजगुरुनगर :** तत्त्वज्ञ, इतिहासकार, कवी, क्रांतिकारक, देशभक्त, साहित्यिक, पत्रकार अशी एकाच मानवी शरीरात असलेली प्रतिभासंपन्न व्यक्तिमत्त्वाची विविध रूपे स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या रूपाने जगाच्या इतिहासात कोरली आहेत. ते खऱ्या अर्थाने महाराष्ट्राचे 'ललामभूत' व्यक्तिमत्त्व असल्याचे गौरवोद्गार डॉ. सच्चिदानंद शेवडे यांनी काढले. हुतात्मा राजगुरू महाविद्यालयातील साहेबरावजी बुट्टे पाटील स्मृती व्याख्यानमालेत 'सावरकर एक झंझावात' या विषयावर डॉ. शेवडे बोलत होते. संस्थेचे संचालक शांताराम घुमटकर, अॅड. मुकुंदराव आवटे, बाळासाहेब सांडभोर, उमेश आगरकर, प्राचार्य डॉ. एस. बी. पाटील, अॅड. राजमाला बुट्टे पाटील, उपप्राचार्य प्रा. जी. जी. गायकवाड, डॉ. कैलास सोनावणे, प्रबंधक कैलास पाचारणे व ग्रामस्थ या वेळी उपस्थित होते. प्रा. धनंजय बोऱ्हाडे यांनी सूत्रसंचालन केले. अक्षय कोळेकर याने आभार मानले.

# महाराष्ट्राचे ललामभूत व्यक्तिमत्त्व म्हणजे सावरकर : डॉ. शेवडे





**राजगुरुनगर, (वार्ताहर ) :** तत्त्वज्ञ, इतिहासकार, कवी, क्रांतिकारक, देशभक्त, साहित्यिक, पत्रकार अशी एकाच मानवी शरीरात असलेली प्रतिभासंपन्न व्यक्तीमत्त्वाची विविध रूपे स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या रूपाने भारताच्याच नव्हे, तर जगाच्या इतिहासात सुवर्णाक्षराने कोरली गेली असून ते खऱ्या अर्थाने महाराष्ट्राचे ललामभूत व्यक्तिमत्त्व असल्याचे गौरवोद्गार डॉ. सच्चिदानंद शेवडे यांनी काढले. ते हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात आयोजित साहेबरावजी बुट्टेपाटील स्मृती व्याख्यानमलेत सावरकर एक झंझावात या विषयावर बोलत होते.

या प्रसंगी संस्थेचे संचालक शांताराम घुमटकर, ॲड. मुकुंद आवटे, बाळासाहेब सांडभोर, उमेश आगरकर, प्राचार्य डॉ. एस.बी. पाटील, व्याख्यानमाला समितीच्या अध्यक्षा ॲड. राजमाला बुट्टेपाटील, उपप्राचार्य प्रा.जी.जी. गायकवाड, प्रबंधक कैलास पाचारणे व ग्रामस्थ उपस्थित होते.

डॉ. सच्चिदानंद शेवडे यांनी पुढे बोलताना सांगितले की, राष्ट्र हेच सावरकरांचे जीवनमूल्य होते. त्यामुळे त्यांचे साहित्य हे राष्ट्रहिताच्या अनुषंगानेच निर्माण झाले आहे. यावेळी त्यांनी सावरकरांच्या जीवनातील निवडक प्रेरणादायी प्रसंग सांगून विद्यार्थ्यांना सावरकरांच्या स्वातंत्र्य चळवळीतील यो-गदानाची माहिती दिली. सावरकरांच्या भाषाशुद्धीच्या चळवळीबद्दल बोलताना त्यांनी मराठी भाषेला सावरकरांनी नव्या शब्दांची देणगी दिली असून रत्नागिरीच्या स्थानबध्दतेच्या काळात अस्पृश्योद्धाराच्या कार्यासोबतच सावरकरांनी भाषाशुद्धीची चळवळ जोमाने चालवली. त्यांच्यामुळेच महापौर, प्रशाला, प्राचार्य, दिग्दर्शन, संकलन, निर्माता असे अनेक शब्द मराठीत रूढ झाल्याचे ते म्हणाले. स्वतंत्र भारतात आपण क्रांतिकारकांची उपेक्षा केल्याचे सांगून महात्मा गांधींच्या हत्येत सावरकरांना जाणीवपूर्वक गुंतवण्यात आल्याचे ते म्हणाले. तारूण्य हे वयावर किंवा केसाच्या रंगावर न ठरता ते त्या त्या व्यक्तीच्या उर्जेवर ठरायला हवे असे सांगून आपण मुलांना पराक्रमाचा इतिहास शिकवत नसल्याने मुलांमध्ये राष्ट्राबद्दलची उर्मी कमी झाली आहे. त्यामुळेच लष्करात अधिकाऱ्यांच्या हजारो जागा रिक्त असल्याचे ते म्हणाले. आपण जातीपातीच्या पलिकडे जाऊन मी भारतीय आहे अशी आपली पहिली ओळख निर्माण करायला हवी. यावेळी त्यांनी महाराष्ट्र सरकारकडे सावरकरांचे इंग्लडमधील निवासस्थान असलेले इंडिय[ा] हाऊस ताब्यात घेऊन तेथे त्यांचे यथोचित स्मारक उभारण्याची मागण[ी] केली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा[.] धनंजय बोऱ्हाडे यांनी, वक्त्यांचा परिचय डॉ. कैलास सोनावणे यांनी तर आभा[र] अक्षय कोळेकर या विद्यार्थ्याने मानले.

# महाराष्ट्राचे ललामभूत व्यक्तिमत्त्व म्हणजे सावरकर : डॉ. सच्चिदानंद शेवडे

**राजगुरुनगर । वार्ताहर**





तत्त्वज्ञ, इतिहासकार, कवी, क्रांतिकारक, देशभक्त, साहित्यिक, पत्रकार अशी एकाच मानवी शरीरात असलेली प्रतिभासंपन्न व्यक्तीमत्त्वाची विविध रूपे स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या रूपाने भारताच्याच नव्हे, तर जगाच्या इतिहासात सुवर्णाक्षराने कोरली गेली असून ते खऱ्या अर्थाने महाराष्ट्राचे ललामभूत व्यक्तिमत्त्व असल्याचे गौरवोद्गार डॉ. सच्चिदानंद शेवडे यांनी काढले. ते हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात आयोजित साहेबरावजी बुट्टेपाटील स्मृती व्याख्यानमलेत सावरकर एक झंझावात या विषयावर बोलत होते.

यां प्रसंगी संस्थेचे संचालक शांताराम घुमटकर, ॲड. मुकुंद आवटे, बाळासाहेब सांडभोर, उमेश आगरकर, प्राचार्य डॉ. एस.बी. पाटील, व्याख्यानमाला समितीच्या अध्यक्षा ॲड. राजमाला बुट्टेपाटील, उपप्राचार्य प्रा.जी.जी. गायकवाड, प्रबंधक कैलास पाचारणे व ग्रामस्थ उपस्थित होते.

डॉ. सच्चिदानंद शेवडे यांनी पुढे बोलताना सांगितले की, राष्ट्र हेच सावरकरांचे जीवनमूल्य होते. त्यामुळे त्यांचे साहित्य हे राष्ट्रहिताच्या अनुषंगानेच निर्माण झाले आहे. यावेळी त्यांनी सावरकरांच्या जीवनातील निवडक प्रेरणादायी प्रसंग सांगून विद्यार्थ्यांना सावरकरांच्या स्वातंत्र्य चळवळीतील योगदानाची माहिती दिली.

सावरकरांच्या भाषाशुद्धीच्या चळवळीबद्दल बोलताना त्यांनी मराठी भाषेला सावरकरांनी नव्या शब्दांची देणगी दिली असून रत्नागिरीच्या स्थानबध्दतेच्या काळात अस्पृश्योद्धाराच्या कार्यासोबतच सावरकरांनी भाषाशुद्धीची चळवळ जोमाने चालवली. त्यांच्यामुळेच महापौर, प्रशाला, प्राचार्य, दिग्दर्शन, संकलन, निर्माता असे अनेक शब्द मराठीत रूढ झाल्याचे ते म्हणाले. स्वतंत्र भारतात आपण क्रांतिकारकांची उपेक्षा केल्याचे सांगून महात्मा गांधींच्या हत्येत सावरकरांना जाणीवपूर्वक गुंतवण्यात आल्याचे ते म्हणाले.

तारूण्य हे वयावर किंवा केसाच्या रंगावर न ठरता ते त्या त्या व्यक्तीच्या उर्जेवर ठरायला हवे असे सांगून आपण मुलांना पराक्रमाचा इतिहास शिकवत नसल्याने मुलांमध्ये राष्ट्राबद्दलची उर्मी कमी झाली आहे. त्यामुळेच लष्करात अधिकाऱ्यांच्या हजारो जागा रिक्त असल्याचे ते म्हणाले. आपण जातीपातीच्या पलिकडे जाऊन मी भारतीय आहे अशी आपली पहिली ओळख निर्माण करायला हवी.

यावेळी त्यांनी महाराष्ट्र सरकारकडे सावरकरांचे इंग्लडमधील निवासस्थान असलेले इंडिया हाऊस ताब्यात गेऊन तेथे त्यांचे यथोचित स्मारक उभारण्याची मागणी केली.

डॉ. संजय शिंदे

प्रसिद्धी विभाग प्रमुख